मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी द्वारा संचालित

# महात्मा गांधी कला, विज्ञान व
# स्व. नसरूद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय

आरमोरी, जि. गडचिरोली

नॅक पुनर्मानांकित 'अ' दर्जा (3.24 CGPA)

## शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभाग
## आणि
## गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
## यांच्या संयुक्त विद्यमाने

# "आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर"

सत्र २०२२—२०२३




# अहवाल

दिनांक : २१ मार्च व २३ मार्च २०२३

शिबिराचे स्थळ : स्व. वामनरावजी वनमाळी नॉलेज सिटी, आरमोरी


समन्वयक

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे
संचालक, शा.शि. व खेळ विभाग
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

आयोजक

डॉ. लालसिंग खालसा
प्राचार्य
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

“RIGHT PLACE FOR BRIGHT FUTURE”
MANOHARBHAI SHIKSHAN PRASARAK MANDAL ARMORI’S
# MAHATMA GANDHI ARTS, SCIENCE & LATE NASARUDDINBHAI PANJWANI COMMERCE COLLEGE
ARMORI Dist. Gadchiroli (M.S.) 441 208
Affiliated to Gondwana University, Gadchiroli
Re-accredited by NAAC ‘A’ with 3.24 CGPA

PRINCIPAL
Dr. Lalsingh H. Khalsa
M. Sc., Ph. D.
Mob. 9422153197
E-mail:lalsinghkhalsa@yahoo.com

S.T.D.: 07137
Office: 266558/266043
Web: mgcollegearmori.ac.in
Email:mgcollege.armori@gmail.com

---

Letter No.__________

Date __________

प्रति,

**मा. संचालक (प्र)**,
विद्यार्थी विकास विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :– आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबीर कार्यक्रमाचा हिशोब व अहवाल पाठवित असल्याबाबत**

**संदर्भ :–आ.पत्र क्र. No.GU/DSD/319/2022 Dt.: 16/11/2022**

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, दि. २१ मार्च व २३ मार्च २०२३ या कालावधीत आमच्या महाविद्यालयामध्ये **आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर** कार्यक्रम राबविण्यात आला .

तरी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर कार्यक्रमाचा **हिशोब** व **अहवाल** आपणाकडे सादर करीत आहो. तरी नोंद घ्यावी.

प्राचार्य

# ‘आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर’

## अहवाल

## २०२२-२३

महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथे येथे दि. २१ मार्च व २३ मार्च २०२३ ला प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर आणि व्यक्तिमत्व विकास शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध कार्यक्रम राबवित असते. .कारण विद्यार्थ्यांचा केवळ गुणात्मक विकासच होणे महत्वाचे नसून सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा,कार्यक्रमाचे उद्घाटक प्रविणजी रहाटे, प्रमुख अतिथी म्हणुन आपत्ती व्यवस्थापन व्याख्याते श्री मंगेशजी मैदुरकर फायर सर्विस, गडचिरोली, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे संचालक, शारीरिक शिक्षण खेळ व क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ.,चंद्रकांत डोर्लीकर, विद्यार्थी विकास विभागाचे प्रा. गजानन बोरकर आदी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषनातून आपत्ती व्यवस्कापनाची संकल्पना स्पष्ट केली. महापुर अग्नीतांडव, भुकंप, महामारी, अपघात दृष्टीने आम्ही विविध प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे आयोजन करीत असतो. काहीवेळा तर सरकारी यंत्रणा सुध्दा मोठ्या संकटांना पुरेशा पडत नाही. अशा प्रसंगी विद्यार्थ्यामध्ये जाग्रृती व समस्या हाताळण्याची माहीती असेल तर विद्यार्थी सेवाभावी वृत्तीने या संकटावर मात करु शकतात.आपत्ती व्यवस्थापनातील संस्कारामुळे विद्यार्थ्यांच्या मनात स्वयंसेवकाची भावना निर्माण होते. आपत्ती ग्रस्तांना मदत करतांना कर्तव्य भावना म्हणुन सहकार्य करावे असे प्रतिपादन प्राचार्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातुन व्यक्त केले.. शिबिराचे उद्घाटन दि.. २१ मार्च २०२३ ला झाले. या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर संचालन प्रा. गजानन बोरकर तर आभार प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले.शिबिराला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. ..

दि. २१ मार्च २०२३ ला आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या पहिल्या दिवसाच्या पहिल्या सत्राचे मार्गदर्शक अधिकारी **मंगेशजी मैदुरकर फायर सर्विस, गडचिरोली**, ‘आकस्मिक अपघातावर प्राथमिक उपचार‘ या विषयावर जीवनात येणाऱ्या विवीध आपत्तीवर मार्ग काढण्याचे प्रात्यक्षिकासह प्रबोधन केले. त्याचप्रमाणे फर्स्ट एड काय आहे आणि त्याचा वापर कसा करावा याची माहीती दिली. साप, विंचु चावल्यास प्राथमिक उपचार काय करावे. तसेच नैसर्गीक आपत्ती म्हणजेच अचानक एखादयाचे अंगावर विज पडली. असेल, तो बेशुध्द झाला असेल अशावेळी त्याला प्राथमिक उपचार कसा करावा किंवा सीपीआर कसा द्यावा याची सखोल माहीती सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन दिली.. अपघात तर रोजच होत असतात मात्र आपल्याला त्याची प्राथमिक माहीती असल्यास आपणसुध्दा अनेकांचे प्राण वाचवु शकतो. असे मत त्यांनी मांडले..अपघातात मार लागणे. हाड मोडणे, गंभीर इजा, रक्तस्त्राव झाल्यास त्याला पटटीबांधुन त्याचा रक्तस्त्राव थांबवुन त्याचा जीव वाचविता येवू शकते... विद्यार्थ्यांशी

सुसंवाद साधतांना त्यांनी पाण्यातील व्यक्तीचे व आग लागलेल्या व्यक्तीला त्याला हाथ न लावता शक्य झाल्यास दुरुन उपचार करावा. पहीले स्वतहाचे जीवन सुरक्षित करावे व नंतर दुस-याचे जिवन वाचवावे हा मोलाचा संदेश त्यांनी दिला.

दुस-या सत्राचे मार्गदर्शक **डॉ विजय गोरडे** यांनी 'नैसर्गिक व मानव निर्मीत आपत्ती व आपत्तीचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन केले. नैसर्गिक व मानव निर्मीत आपत्ती नियंत्रणासाठी विविध सूचना, दक्षता आणि काळजी घेण्याविषयी पीपीटी दाखवुन सखोल माहीती दिली. कोणत्याही नैसर्गिक व कृत्रिम आपत्ती प्रसंगी स्वयंसेवकांनी जखमी आणि आपत्तीत सापडलेल्या व्यक्तींची सुरक्षित सुटका कशी करावी आणि जखमी विपत्ती ग्रस्तांवर प्रथमोपचार करून त्यांना सुरक्षित स्थळी कसे हलवावे, त्याच प्रमाणे स्वतःची सुरक्षा कशी करावी याचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह धडे दिले. अनेक व्हिडिओक्लीप दाखवून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली आणि विद्यार्थ्यांना जखमींना स्वयंस्फूर्तीने सहकार्य करण्याची प्रेरणा दिली.

दि. २३ मार्च २०२३ ला प्रथम स‌त्रात **प्रा. डॉ.,चंद्रकांत डोर्लीकर** यांनी 'भुकंप व त्याचे व्यवस्थापन' यावर माहिती देतांना भुकंपाचे प्रकार काय? आहेत भुकंप आल्यास त्या पासुन आपल्याला स्वतहाचे प्राण कसे वाचविता येवु शकते. असे अमुल्य मार्गदर्शन करतांना माहीती दिली .भुकंप,.वादळे, विज पडणे अशी नैसर्गिक आपत्ती आल्यास सुरक्षित ठिकाणी वास्तव्यास जावे. झाडाखाली उभे राहु नये. असे मौलिक मार्गदर्शन केले.

दि. २३ मार्च २०२३ ला. **श्री वृषभ हजारे** यांनी 'आपत्ती व्यवस्थापनाची उपकरणे व त्याची उपयोगीता' यावर आपल्या मार्गदर्शनातुन त्यांनी कशाप्रकारचे आग विझविण्याचे साहीत्य फायर इस्टीग्युशर त्याचे प्रकार किती आहेत त्याचा वापर पेट्रोल पंपावर, ईलेक्ट्रीक वस्तुवर किंवा घरी सिलेंडरला आग लागल्यास ते कसे विझवावे वापर कसा करावा याची माहीती दिली. तसेच मोठ्या कंपनीमध्ये आग लागल्यास कोणते आग विझविण्याचे साहीत्य वापरतात त्याची माहीती दिली. .

**श्री अनुज घोसे अग्निसुरक्षा रक्षक** व **अंकुर रामटेके** वाहन चालक यांनी फायरब्रिगेड म्हणजे काय ती गाडी संबंधी संपुर्ण माहीती व्हिडिओ चित्रफितीद्वारे सांगितली. अग्निशमक वाहनात आग विझविण्याचे यंत्र कशा प्रकारे कार्यकरीत असतात वाहनात किती लीटर पाणी असते आग विझविण्या करीता कोणकोणते व्हॉल्हचा वापर करावा याचे प्रात्यक्षिक करून दाखविले व विद्यार्थ्याकडुन ते करवुन घेतले

तसेच विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापन विषयात सुध्दा आपले करीयर घडविता येवु शकते. त्याकरीता डिप्लोमा व डिग्री कोर्सेस सुध्दा उपलध्द आहेत. १२वी पास झाल्यानंतर या आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात सुध्दा अनेक नोकरी विषयक संधी उपलब्ध आहेत. आज प्रत्येक कंपनी मध्ये फायरमन च्या जागा रिक्त आहेत अशी संपुर्ण सखोल माहीती त्यांनी आपल्या मार्गदर्शनातुन व्यक्त केली.

दि. .२८ मार्च २०२३ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिर आणि व्यक्तीमत्व विकास शिबीर असे दोन्ही समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन डॉ.चंद्रकांत डोर्लीकर, डॉ जयेश पापडकर तसेच आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, व्यक्तीमत्व विकासाचे प्रा. गजानन बोरकर., गजेंद्र कढव आणि प्रशांत दडमल. आदी उपस्थित होते यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी दोन्ही शिबीरार्थ्यांनी मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले..

समारोपीय शिबिराचे संचालन प्रा.गजानन बोरकर यांनी केले तर आभार प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. डॉ. गजेंद्र कढव, प्रा. अनिल राऊत, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. पुडलीक व्याहाडकर, प्रा. संजय गिरडकर, श्री. प्रशांत दडमल, श्री. सचिन ठाकरे यांनी सहकार्य केले. शिबिरात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

समन्वयक

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वि. ठाकरे
संचालक शारीरिक शिक्षण व खेळ विभाग

प्राचार्य

डॉ. लालसिंग एच. खालसा
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

महात्मा गांधी कला विज्ञान व स्व. नभाजयदीनभाऊ राजकाली वाणिज्य महाविद्यालय ★ आरमोरी ★

**'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबीर'**

(दि. २१ मार्च ते २३ मार्च २०२३)

## खर्चाचा तपशिल

| अ. क्र. | विवरण | नग | दर रूपये | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रमाणपत्र<br>मोमेंटो<br>बॅनर | ११०<br>०१<br>२ | १३.५०<br>—<br>३८४ | १,४८५<br>२५०<br>७६७ |
| २ | पुष्पहार, व पुष्पगुच्छे | — | — | ३५० |
| २ | चहा,नाश्ता आणि जेवण<br>पाणी कॅन | २२० | ५० | ११,००० |
| ४ | मानधन | ४ व्यक्ती | . | २,५०० |
| | **एकूण रक्कम** | | | **१६,३५२** |

प्राचार्य
डॉ. लालसिंग एच. खालसा
महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरामध्ये दिप प्रज्वलीत करतांना उद्‌घाटक
मा. श्री प्रविणजी रहाटे पत्रकार, अध्यक्ष प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा व मान्यवर



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरामध्ये अध्यक्षीय भाषण करताना
प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा




आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरामध्ये उद्घाटक मा. श्री प्रविणजी रहाटे पत्रकार यांचे शाल व श्रीफळ व मोमेंटो देवुन सत्कार करतांना मान्यवर



**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरामध्ये उद्घाटक मा. श्री प्रविणजी रहाटे पत्रकार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना**




**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरामध्ये प्रमुख अतिथी म्हणुन मार्गदर्शन करताना मा. श्री मंगेशजी मैदुरकर**




**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती** शिबिराच्या दुस-या दिवसाचे

अग्निशमन वाहन विषयक **मार्गदर्शन करताना मा. श्री अनुज घोसे व अंकुर रामटेक**






महात्मा गांधी कला विज्ञान



शिबिराच्या दुस-या दिवसाचे मार्गदर्शक श्री वृषभ हजारे व अनुज घोसे आग विझविण्याचे साहीत्य **फायर इस्टीग्युशर** विषयी मार्गदर्शन करतांना







**आग विझविण्याचे प्रात्यक्षिक करतांना शिबीरार्थी**



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती शिबिरामध्ये पहिला दिवसाचे पहिले सत्रात मा. श्री मंगेशजी मैदुरकर 'आकस्मिक अपघातावर प्राथमिक उपचार' मार्गदर्शन करताना









शिबिराच्या पहिला दिवसाचे दुस-या सत्रात मार्गदर्शक डॉ. विजय गोरडे 'नैसर्गिक व मानव निर्मीत आपत्ती व आपत्तीचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन









आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती समारोपीय कार्यक्रमात प्रमाणपत्र वाटप करतांना
डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, डॉ. जयेश पापडकर , डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे व प्रा. गजानन बोरकर






# पेपर कात्रणे

Lokmat 25.03.2023

## समस्या हाताळण्याचे ज्ञान असेल तरच संकटांवर मात

### प्राचार्य खालसा : आपत्ती व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**आरमोरी :** अग्नितांडव, महापूर, भूकंप, महामारी, अपघात आदींसह अनेक संकटांना अनपेक्षितपणे मानवाला तोंड द्यावे लागते. अशाप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती नसते. त्यामुळे अपरिमित जिवित आणि वित्तहानी होते. सरकारी यंत्रणासुद्धा संकटांना पुरेशा पडत नाहीत. अशावेळी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जागृती व समस्या हाताळण्याची माहिती असेल तर विद्यार्थी सेवाभावी वृत्तीने या संकटावर मात करण्यास सहकार्य करू शकतात, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी केले.

आरमोरी येथील महात्मा गांधी कला विज्ञान व स्व. नसरुद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालयात गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, महाविद्यालयातील विद्यार्थी विकास परिषद, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आपत्ती व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास' शिबिराच्या प्रारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, क्रिडा व शारीरिक शिक्षण विभागाचे निर्देशक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, गडचिरोली नगर परिषदेच्या फायर सर्व्हिसेसचे मंगेश बैतुलकर, प्रा. गजानन बोरकर, पत्रकार व कासवीचे माजी उपसरपंच प्रवीण रहाटे उपस्थित होते. प्रास्तविक उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, सूत्रसंचालन प्रा. गजानन बोरकर तर आभार प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे यांनी मानले. प्रा. डॉ. छगन मुंगमोडे, प्रा. डॉ. वसंता कहालकर, प्रा. पराग मेश्राम, प्रा. डॉ. विजय गौरडे यांनी सहकार्य केले.



मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, सोबत डॉ. डोर्लीकर, रहाटे.

#### ... तर स्वत:सह इतरांचेही प्राण वाचेल

- विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासोबतच बाहेरचे ज्ञान असावे. संकटकाळी धीर ठेवून त्याचा सामना करताना हे ज्ञान उपयोगी पडते. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासह स्वसंरक्षण कसे करता येईल, सोबतच इतरांचाही बचाव कसा करता येईल असे प्रतिपादन प्रवीण रहाटे यांनी केले.

## म. गांधी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन , व्यक्तिमत्व विकास शिबिर



**आरमोरी -** महात्मा गांधी कला विज्ञान व स्व.नसरुद्दीनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय ,आरमोरी येथील गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, महाविद्यालयातील विद्यार्थी विकास परिषद , क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आपत्ती व्यवस्थापन व व्यक्तिमत्व विकास शिबिराचा प्रारंभ झाला.

यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. खालसा होते. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे निर्देशक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे, गडचिरोली नगरपरिषदेचे फायर ब्रिगेडचे मंगेश बैतुलकर , प्रा. गजानन बोरकर, पत्रकार प्रवीण रहाटे उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. खालसा म्हणाले, अग्नितांडव, महापूर, भूकंप, महामारी, अपघात इ. अनेक संकटांना अनपेक्षितपणे मानवांना तोंड द्यावे लागते. अशा प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना माहिती नसते त्यामुळे अपरिमित जीवित आणि वित्त हानी होत असते. सरकारी यंत्रणासुद्धा या आसमानी, सुलतानी संकटांना पुरेशा पडत नाही. अशाप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जागृती व समस्या हाताळण्याची माहिती असेल तर विद्यार्थी सेवाभावी वृत्तीने या संकटावर मात करण्यास सहकार्य करू शकतात. ते नियम, संस्कार, धर्म, शिस्त समजून घेतले तर विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबत या ज्ञानाने त्यांचे जीवन समृद्ध व सुरक्षित होईल. विविध कौशल्ये, चरित्र, प्रामाणिकपणा, सहकार्य भावना , तळमळ, लोक संग्रह इ . गुणांची सकारात्मक जोपासना केल्याने विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होवू शकते. आपत्ती व्यवस्थापनातील संस्कारामुळे विद्यार्थ्यांच्या मनात स्वयंसेवकाची भावना निर्माण होते. आपत्तीग्रस्तांना मदत करताना कर्तव्यभावना म्हणून सहकार्य करावे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी केले.

यावेळी मुख्य मार्गदर्शक प्रवीण रहाटे यांनी [illegible] व त्यांच्या उपसरपंचपदाच्या काळातील अनेक प्रसंगांची आठवण करून दिली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अशा पद्धतीच्या माहितीची जाणीव असल्यास त्यांचा स्वतःचा व इतरांचा प्राण [illegible] सहकार्य होऊ शकतो असे प्रतिपादन केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत डोर्लीकर यांनी केले. संचालन प्रा. गजानन बोरकर यांनी केले.